## **Model Question Paper (CWSN)**

Marathi (FL ) (80)

**सुचना :-** प्रत्येक प्रश्नचे उत्तर नवीन पानावर लिहा
प्रश्नाचे व उपप्रश्नाचे क्रमांक स्पष्टपणे लिहा.
सर्व प्रश्न आवश्यक आहेत.
उजवीकडील अंक प्रश्नाचे गुण दर्शवितात

प्रश्न १ अ) पुढील प्रत्येक विधानाखाली चार पर्याय दिलेले आहेत त्यातील योग्य पर्याय निवडून विधानासमोर लिहा. (५)

१. राजा प्रल्हाद ------------------------------
अ) अत्यंत ज्ञानसंपन्न होता .
ब) अत्यंत शीलसंपन्न होता .
क) अत्यंत धर्मसंपन्न होता .
ड) अत्यंत धैर्यसंपन्न होता .

२. लेखक पं. महादेव शास्त्री जोशी आपल्या मित्राबरोबर --------------------------
१ गुजराती भाषेत बोलू लागले
२ इंग्रजी भाषेत संभाषण करू लागले
३ चिटपावनी भाषेत संभाषण करू लागले
४ मराठी भाषेत संभाषण करू लागले

३. शिखर खो-याची सारी सुषमा पहायला सारा ----------------------------------
अ) संपूर्ण दिवस अपुरा पडतो
ब) दोन पाय अपुरे पडतात
क) संपूर्ण आयुष्य अपुरे पडेल
य) पूर्ण आठवडा अपुरा पडतो

४. युद्ध नेहमीच -----------------------------
अ) अमानुष असते
ब) अमानवी असते
क) भयानक असते
य) वाईटच असते

५. लोक त्याला गाडेकर म्हणायचे कारण -------------------------------------
अ) त्याच्यापाशी एक गाडा होता .

ब) त्याच्यापाशी एक बैल गाडा होता .

क) त्याची बैलगाडी होती .

य) त्याचा दोन रेड्यांचा एक गाडा होता

ब) पुढीलपैकी कोणत्याही पाच प्रश्नाची उत्तरे एका वाक्यात लिहा . ५

१. गोपूला खाण्यासाठी काय दिले ?

२. शुक्राने इंद्राला काय दिले ?

३. शिवाजी राजानी येसाजीला कोणती आज्ञा केली ?

४. कोणता मासा झाडावर चढतो ?

५. छोट्या काश्मिरी मुलीला स्वर्ग मिळाल्याचा आनंद केव्हा झाला ?

६. गावात रोमटे केव्हा नाचत ?

७. गोकूळचा स्वभाव कसा आहे ?

प्र.२ अ) खाली 'अ' गटात पाठाची नाले व 'ब' गटात त्यांच्या लेखकाची नावे दिली आहेत त्यांच्या योग्य जोड्या जुळवा . ४

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| १. खरा वैज्ञानिक कोण ? | अ) ह.ना. नार्वेकर |
| २. चोरी | ब) जयंत नारळीकर |
| ३. गाडेकर | क) रा. ग. गडकरी |
| ४. गोकूळ | य) मधू मंगेश कर्णिक |

ब) खालीपैकी कोणत्याही एकाचे उत्तर २/३ वाक्यात लिहा ३

१. समुद्रिवंचवाची घरे कशी असतात ?

२. प्रल्हाद इंद्राच्या कोणत्या गुणावर खुष झाला. ?

३. कुशाबाचे शेत कसे होते ?

प्र.३रा अ) पुढील विधानाखाली चार पर्याय दिलेले आहेत त्यातील अचूक पर्याय निवडून विधान पूर्ण करून लिहा. २

१) नाचू किर्तनाचे रंगी ----------------------------

अ तेथे राहू विरंतर

ब ज्ञानदीप लावू जगी

क वाचे विठ्ठल रखुमाई

ड तेचि माझे रूप पूर्ण

२. झोके घेत कसे चहुकडे -------------------------------

अ पंख कितीकांचे

ब सुंदर साळीचे

क हिरवे गालिचे

ड मखमली सोन्याचे

ब) खाली दिलेल्या काव्यशांच्या योग्य जोड्या लावा. २

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| १. विसरून जाय जेव्हा | अ) छातीत रोवून |
| २. चला रे चक्रांनो | ब) धर्मांध आक्रमकाचे |
| | क) फिरत गरारा |
| | ड) माणूस माणसाला |

क) खालील कवितेच्या ओळीतील मोकळ्या जागी कंसात दिलेल्या पर्यायी शब्दापैकी योग्य शब्द लिहून ओळी पूर्ण करून लिहा ४

१. पंचप्राण लावुनी ------------- तया करा (पूजा , आरती, भक्ती )

२. मोक्ष अथवा बंधन, सुख ----------- इच्छा ते. (दुःख, आनंद , समाधान )

३. त्यागी व्हा ,शूर व्हा, वीर ---------------- व्हा (झुंजार , प्रखर, अमर)

४. हे बंध ---------------- ठेवी जपून जीवा (रेशमाचे, स्नेहाचे , प्रेमाचे)

प्र. ४ खालीपैकी कोणत्याही पाच प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा ५

१. जमीन आगगाडीला कशी विनवित आहे ?

२. जगाला जळणारी विक्राळ ज्वाला केव्हा निर्माण होते ?

३. कोणाच्या संगतीने लोहाचे सुवर्ण होते ?

४. माय केव्हा हतबल झाली ?

५. सोन्याचा गोळा असे कविने कोणाला म्हटले आहे?

६. आपण पाठांतर केव्हा करावे असे समर्थ रामदास सांगतात ?

७. भविष्य रंगविण्यासाठी कविने कोणा कोणाची आठवण केली आहे?

प्रश्न ५ अ) कंसातील सुचनेप्रमाणे लिहा ५

१. सुदेश घरी गेला (नाम ओळखून लिहा )

२. तो घरी जायला निघाला . (सर्वनाम ओळखा )

३. संत तुकारामांनी अभंग लिहीले (काळ ओळखा )

४. आम्ही खूप अभ्यास करतो (क्रियापद ओळखा )

५. उन्हाळ्यात खूप पर्यटक येतात . (विशेषण ओळखा )

ब) पुढील वाक्यातील अधोरेखित शब्दांच्या जाती ओळखून लिहा . ४

१. मस्तकावरच्या हिमावर सोनेरी वर्ख चढला होता .

२. जीपमध्ये सर्व कुमक घेतली आणि तो निघाला .

क) पुढील उदाहरणाप्रमाणे खालील शब्दापासून विशेषण बनवा ३

जसे : कष्ट - कष्टाळू

कृपा

माया

विसर

उ) पुढील शब्दापासून भाववाचक नामे बनवा ३

जसे : माणूस - माणूसकी

पाटील -

गाव -

बांधील-

इ) खालील शब्दांचे लिंगे बदलून लिहा ३

| | पुल्लिंग | | स्त्रीलिंग |
|---|---|---|---|
| जसे : | नवरा | - | नवरी |
| | कुमार | - | |
| | बकरा | - | |
| | छोकरा | - | |

ई एकवचन अनेकवचन सांगा ३

जसे : छत्री - छत्र्या

बाहुली -

गाडी -

पट्टी -

प्रश्न६ वा अ) विरूद्धार्थी शब्दाच्या योग्य जोड्या लावा . ३

| | 'अ' | 'ब' |
|---|---|---|
| १ | खुळा | अ) तोटा |
| २ | नफा | ब) अस्त |
| ३ | उदय | क) शहाणा |

ब) खालील समानार्थी शब्दाच्या योग्य जोड्या लावा . ३

| ‘अ’ | | ‘ब’ |
|---|---|---|
| १ | जल | १) आकाश |
| २ | मेघ | २) पाणी |
| ३ | अंबर | ३) ढग |

क) खालील शब्दांचे नामाच्या प्रकारामध्ये वर्गीकरण करा ४

(सामान्य, विशेषनाम, भाववाचक नाम)

१) फोंडा २) घर ३) गाडी ४) वही

५) सीता ६) बालपण ७) गाडी ८) श्रीमंती

ड) खालील वाक्यातील सर्वनामे ओळखून लिहा ४

१ भारत माझा देश आहे.

२ तुझ्या गावाचे नाव सांग

३ मला गणित विषय आवडतो

४ आम्ही सहलीला जाणार.

इ खालील वाक्यातील अव्ययें ओळखून लिहा. ४

१ रात्री सगळे गावकरी सद्भाऊच्या पडवीवर जमा झाले.

२. गावात जा आणि पाटलांना तेथे घेऊन या.

३. तो वेगाने निघाला

४. “ बरं! मी आपली रजा घेत आता.”

प्रश्न७ पाठ्यपुस्तकातील खालील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा ५

फार प्राचीन काळजी कथा आहे. दैत्यकुलोत्पन्न राजा प्रल्हाद अत्यंत शीलसंपन्न होता. त्याने कोणाचाही कधी द्रोह केला नाही. त्याचे दातृत्व तर प्रसिद्धच होते. आपल्या प्रत्येक कृतीने इतरांचे हित झाले पाहीजे अशी त्याची दृष्टी होती. शीलाच्या सामर्थ्यावर त्याने देवेंद्राचे राज्य काढून घेतले. आणि तो त्रैलोक्याचा धनी बनला. इंद्राला इंद्रपद सोडावे लागले. महाज्ञानी इंद्रावर मोठा बिकट प्रसंग ओढवला तो विचार करू लागला, माझे श्रेष्टपद प्रल्हादाला कसे प्राप्त झाले. हे समजत नाही विचार करून त्याची बुद्धि थकली. पण प्रल्हाद च्या विशेष गुणाचा शोध लागला नाही.

१. राजा प्रल्हाद कोणत्या कुळात जन्मलेला होता ?

२. राजा प्रल्हाद कसा होता ?

३. त्याची दृष्टी कशी होती ?

४. कशाच्या सामर्थ्यांवर त्याने देवेंद्राचे राज्य काढून घेतले ?

५. इंद्रावर कोणता बिकट प्रसंग ओढवला ?

**किंवा**

६. इंद्राला कशाचा शोध लागला नाही ?

प्रश्न ८ पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा . ७

पाणी म्हणजे जीवन . पाणी म्हणजे शक्ती पाणी म्हणजे बहुमोल संप्पती पण हेच मुल्यवान पाणी जर सैरावैरा वहायला लागले तर तेच पाणी जीवन घडिवण्याऐवजी जीवन बिघडावयाल गिंळकृत करायला पुढे झेपावेल . तसेच मौल्यवान वेळ, मौल्यवान जीवन, मुकाट सुटले तर आपल्याला चालणार नाही सोन्यालासुद्धा मुशीतून जावे लागले , आपणही आपले जीवन हेच शिस्तिच्या मुशीतून काढायला हवे. आपल्या आचार , विचार, उच्चाराला शिस्त ही हवीच हवी. कधीही झोपा, कधीही उठा , काहीही खावा, कसेही वागा ,काहीही बोला , काहीही ऐका, असे बेछुद जीवन जगणा-या माणसाची, प्रगती कधीच होत नाही. शिस्त म्हणजे सुनियंत्रण शिस्त महणजे आखीव. रेखीव जीवन दंड किंवा शिक्षेने, भीतीने पाळलेली शिस्त क्षाणिक असते. शिस्त शुद्ध जीवनामुळे वेळ , पैसा, श्रम सायाची बचत होते .

१. बेछुद जीवनामुळे सा-यांचे कोणते नुकसान होते.

२. सैरावैरा धावणारे पाणी काय करते?

३. शिस्तबद्ध जीवनाचा कोणता फायदा होतो ?

४. शिस्त म्हणजे काय?

५. कोणती शिस्त क्षाणिक असते ?

६. उतायाला योग्य शीर्षक द्या ?

## उत्तरपत्रिका

प्रश्न १ ला अ) १. राजा प्रल्हाद अत्यंत शीलसंपन्न होता. ५)

२. लेखक पं. महादेवशास्त्री जोशी, आपल्या मित्राबरोबर चित्पावनी भाषेत संभाषण करू लागले.

३. शिखर खोयाची सारी सुषमा पहायला सारा दिवस अपुरा पडतो.

४. युद्ध नेहमीच अमानुष असते.

५. लोक त्याला गाडेकर महणायचे कारण ..................... त्याचा दोन रेड्यांच्या एक गाडा होता.

ब) १. आईने गोपूला खाण्यासाठी नाचणीची भाकरी व चटणी दिली. ५)

२. शुक्राने इंद्राला उत्कृष्ट ज्ञानाची प्राप्ती करून दिली.

३. रांझाच्या पाटलांच्या मुसक्या आवळून आपल्यासमोर हजर करण्याची आज्ञा राजानी येसाजीला केली.

४. डेमका मासा झाडावर चढतो .

५. लेखिकेने तिला चपलाचा जोड दिल्यावर काश्मिरी मुलीला स्वर्ग मिळाल्याचा आनंद झाला.

६. गोकूळचा स्वभाव विसरभोळा आहे.

७. धुळवडीच्या आधी दोन दिवस गावात रोमटे नाचत.

प्रश्न २ रा अ) ४)

| | ‘अ’ | ‘ब’ |
|---|---|---|
| १ | खरा वैज्ञानिक कोण ? | जयंत नारळीकर |
| २ | चोरी | मधू मंगेश कर्णिक |
| ३ | गाडेकार | ह. ना . नार्वेकर |
| ४ | गोकूळ | रा. ग. गडकरी |

ब) १. समुद्रविसवांची घरे बाहेरून वारूळासारखी दिसतात. आत नर व मादी राहते. ते मातीच्या ओल्या गोळ्यांनी घर बांधतात. जमिनीवर एक –दोन हात उंच असलेलं हे घरटं खाली नऊ ते दहा हात खोल असतं. मादी घरट्यात अंडी घालते व तिथेच पिल होतात. ३)

२. इंद्राची ज्ञानजिज्ञासा , सेवाबुद्धि, विनयसंपन्नता पाहून प्रल्हाद अत्यानंदीत झाला. त्याची योग्य ती गुरूसेवा पाहून तो संतुष्ट झाला.

३. कुशाबाचे शेत मोठाले पण योग्य आखलेले होते. तेथून पाव पैलावर एक लहान शेत होते. त्या शेताचे दोन लहान -लहान भाग केले होते. प्रत्येक भागात धान्य वेगवेगळ्या स्थितीत दिसत होते.

प्र३रा अ) १. नाचू कीर्तनाच्या रंगी ......... ज्ञानदीप लावू जगी. २)

२. झोके घेत कसे चहुकडे ......... हिरवे गालिचे.

ब) २)

| | 'अ' | 'ब' |
|---|---|---|
| १. | विसरून जाय केव्हा | माणूस माणसाला |
| २. | चला रे चक्रांनो | फिरत गरारा |

क) ४)

१. पंचप्राण लावूनी <u>आरती</u> तया करा
२. मोक्ष अथवा बंधन, सुख <u>समाधान</u> इच्छा ते.
३. त्यागी व्हा, शूर व्हा <u>वीर</u> व्हा झुंजार व्हा.
४. हे बंध <u>रेशमाचे</u> ठेवी जपून जीवा.

प्र.४था ५)

१. नको ग, नको ग अशी तू मला चुरून टाकू, नको ग, नको ग तू बेहोषीने मला अशी तू जाळत जाऊ" अशी जमीन आगगाडीला विनवीत आहे.
२. जेव्हा माणूस माणसाला विसरून जातो तेव्हा जगाला जाळणारी विक्राळ ज्वाला निर्माण होते.
३. परिसाच्य संगतीने लोहाचे सुवर्ण होते.
४. तान्ह्या मुलाचा आकस्मिक मृत्यु पाहून माय हतबल झाली.
५. मावळत्या सुर्याला 'सोन्याचा गोळा'असे कवीने म्हटले आहे.
६. आपण सदा सर्वदा पाठांतर करावे असे समर्थ रामदास सांगतात.
७. भविष्य रंगिवण्यासाठी कवीने छत्रपती शिवाजी, प्रतापी योद्धे आणि भूतकाळ याची आठवण केली आहे.

प्र.५ वा. १. नाम ५)

२. तो

३. भूतकाळ

४. करतो

५. खूप

ब) १. सोनेरी ---- विशेषण २)

होता --- क्रियापद

२. मध्ये --- शब्दयोगी अव्यय २)

आणि --- उभयान्वयी

क) १. कृपाळू ३)

२. मायाळू

३. विसराळू

१. पाटीलकी ३)

२. गावकी

३. बांधीलकी

इ) १. कुमार ३)

२. बकरा

३. छोकरा

ई) १. बाहुल्या ३)

२. गाड्या

३. पट्ट्या x

प्र. ६ वा

अ) १. खुळा x शहाणा ३)

२. नफा x तोटा

३. उदय x अस्त

ब) १. जल -- पाणी ३)

२. मेघ -- ढग

३. अंबर -- आकाश

क) ४)

| सामान्यनाम | विशेषनाम | भाववाचकनाम |
| --- | --- | --- |
| घर | फोंडा | गोडी |
| वही | सीता | बालपण |
| गाडी | | श्रीमंती |

ड) १. माझा ४)

२. तुझ्या

३. मला

४. आम्ही

ई १. वर – शब्दयोगी अव्यय ४)

२. आणि – उभयान्वयी अव्यय

३. वेगाने --- क्रियाविशेषण अव्यय

४. बर! -- उद्‌गारवाचक किंवा केवलप्रयोगी अव्यय

प्रश्न ७ वा १. राजा प्रल्हाद दैत्य कुळात जन्मलेला होता. ५)

२. राजा प्रल्हाद अत्यंत शीलसंपन्न होता

३. आपल्या प्रत्येक कृतीने इतरांचे हित झाले पाहीजे अशी त्याची दृष्टी होती.

४. शीलाच्या सामर्थ्यावर त्याने देवेंद्राचे राज्य काढून घेतले.

५. प्रल्हाद त्रैलोक्याचा धनी बनल्याने इंद्राला इंद्रपद सोडवे लागले, हा बिकट प्रसंग त्याच्यावर ओढवला.

**किंवा**

६. इंद्राला प्रल्हादाच्या विशेष गुणाचा शोध लागला नाही.

प्रश्न ८

१. बेछुद जीवन जगणाया माणसाची प्रगती कधीच होत नाही. ७)

२. सैरावैरा धावणारे पाणी जीवन घडविण्याऐवजी जीवन बिघडावायला गिळंकृत करायला पुढे झेपावेल.

३. शिस्त शुद्ध जीवनामुळे वेळ, पैसा, श्रम सायाची बचत होते.

४ शिस्त म्हणजे आखीव रेखीव जीवन.

५. दंड किंवा शिक्षेने, भीतीने पाळलेली शिस्त क्षणिक असते.

**किंवा**

६. पाणी म्हणजे जीवन.

# Marathi First Language
# C. W. S. N Marathi Syllabus (X)

## गद्य विभाग

| | | |
|---|---|---|
| १) | राजाचे शील | स.मा. गर्गे |
| २) | जंगलाचं देणं | मारूती चित्तमपल्ली |
| ३) | गोकुळ | राम गणेश गडकरी |
| ४) | गाडेकार | ह.ना. नार्वेकर |
| ५) | पेहलगाम | सौ.  नंदा मडकईकर |
| ६) | महावीर चक्रधारी मे भास्कर रॉय | ग. प. प्रधान |
| ७) | चोरी | मधु मंगेश गडकर |
| ८) | शिवाजी राजे भोसले | कै. रणजीत देसाई |
| ९) | खरा वैद्यानीक कोण | जयंत नारळीकर |
| १०) | अमृताची वाट | कै. पं . महादेवशास्त्री |

## वगळलेले पाठ

| | | |
|---|---|---|
| १) | स्वरूप पाहा | कै. आचार्य विनोबा भावे |
| २) | बेचाळीसच्या क्रांतीचे सेनानी | चंद्रकांत पाटगांवकर |

## पद्यविभाग

| | | |
|---|---|---|
| १) | नाचू कीर्तनाच्या रंगी | संत नामदेव |
| २) | मन करा रे प्रसन्न | संत तुकाराम |
| ३) | गई लेखनाची | |

## आधुनिक काव्य

| | | |
|---|---|---|
| १) | सायंकाळी शोभा | भा. रा. तांबे |
| २) | आगगाडी न जमीन | कुसुमाग्रज |
| ३) | उठा उठा तयार व्हा ! | विंदा करंदीकर |
| ४) | हे बंध रेशमाचे रेशमाचे | शांता शेळके |
| ५) | तप्त डाबर टिळा | अवधूत कुडतरकर |
| | वगळलेल्या कविता | |
| | प्रबोधन - | अज्ञात |
| | आम्ही कोण | केशव कुमार |

१)	शब्दांच्या जाती (विकारी व अविकारी)  ओळखणे
२)	काळ (मुख्य प्रकार )
३)	वाक्यप्रचार अर्थ  (उलट अर्थाच्या जोड्या)
४)	इतर

नामाचे प्रकार -सामान्य नाम / विशेषनाम / भाववाचक नाम

समानार्थी शब्द –जोड्या लावणे

विरूद्धार्थी शब्द

वचन प्रकार

लिंग भेद

पदपरिस्फोट (व्याकरण चालवणे )

शब्दांपासून –विशेषमे भाववाचक नाम बनवणे

५)	उतारा – पुस्तक
६)	बाहेरील

रचना म्हणजे निबंध, पत्रलेखन , वगैरे प्रकार वगळले आहेत.

# Marathi First Language
# for Children with Special Needs
# Marking Scheme (X)

---

### गद्य विभाग

| | | | |
|---|---|---|---|
| प्र.१ ला | अ) | अचूक पर्यायासाठी प्रत्येकी १ मार्क | ५) |
| | ब) | एका वाक्यात उत्तरे प्रत्येकी | ५) |
| प्र.२ रा | अ) | जोड्या जुळवा | ४) |
| | ब) | दोन तीन वाक्यात एका प्रश्नाचे उत्तर | ३) |

### पद्य विभाग

| | | | |
|---|---|---|---|
| प्र.३ रा | अ) | अचूक पर्यायासाठी प्रत्येकी १ मार्क | २) |
| | ब) | काव्यांशाच्या जोड्या लावणे | २) |
| | क) | मोकळ्या जागा भरणे प्रत्येकी १ मार्क | ४) |
| प्र.४ था | अ) | एका वाक्यात उत्तरे प्रत्येकी १ मार्क | ५) |
| प्र.५ वा | अ) | सूचनेप्रमाणे बदल करणे | ५) |
| | ब) | अधोरेखित शब्दाच्या जाती ओळखणे प्रत्येकी १ मार्क | ४) |
| | क) | शब्दापासून उदाहरण प्रमाणे विशेषण प्रत्येकी १ मार्क | ३) |
| | ड) | उदाहरणप्रमाणे भाववाचक नामे बनविणे . | ३) |
| | इ) | उदाहरणप्रमाणे शब्दांची लिंगे बदलणे . | ३) |
| | ई) | वचनभेद सांगणे प्रत्येकी मार्क | ३) |
| प्र.६ वा | अ) | विरूद्धार्थी शब्दां च्या योग्य जोड्या लावणे. | ३) |
| | ब) | समानार्थी शब्दां च्या योग्य जोड्या लावणे. | ३) |
| | क) | शब्दाच्या नामाच्या प्रकारात वर्गीकरण करणे . | ४) |
| | ड) | वाक्यातील विकारी शब्द ओळखणे. | ४) |
| | इ) | वाक्यातील अविकारी (अव्यय ) ओळखणे. | ४) |

| | | |
|---|---|---|
| प्र.७ वा | पाठ्यपुस्तकातील उता-यावरील प्रश्नोत्तरे | ५) |
| प्र.८ वा | पाठ्यपुस्तकाबाहेरील उता-यावरील प्रश्नोत्तरे | ६) |

Goa Board of secondary and higher Secondary Education Design of the Question paper (Std X)

1 weight of learning outcomes

| **Sr. No.** | **Learning outcomes** | **Marks** | **% of Marks** |
|---|---|---|---|
| 1. | Knowledge (ज्ञान) | 30 | 30**%** |
| 2. | Understanding (आकलन) | 33 | 33**%** |
| 3. | Application (उपयोजन) | 17 | 17**%** |
| 4. | Skill (कौशल्य) | -- | -- |
| | | | 80 |

2. Weightage of contents subject units

| **Sr. No.** | **Learning outcomes** | **Marks** |
|---|---|---|
| 1. | गद्य विभाग | 15 |
| 2. | पद्य विभाग | 15 |
| 3. | शब्दसंग्रह | 10 |
| 4. | व्याकरण | 29 |
| 5. | वाचन | 11 |
| | | 80 |